वाचले-

१. मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ७८२२ दि. १६/१२/२०२०.
२. जाहिरात क्र. ५८१ दि. ०७/१२/२०२०.
३. दिनांक २३ व २४ डिसेंबर २०२० रोजी घेण्यात आलेल्या लेखी स्पर्धा परिक्षा व तज्ञ वैदयकिय अधिकारी यांचे मार्किंग पॅटर्ननुसार गुणांकन यादी
४. आदेश क्रमांक क्रमाक - वैद्य/१७/कावि/९८/२०२१.दि. २७/०१/२०२१तदनंतरचे निर्गत विविध आदेश.
५. मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ८७४७ दि. २६/०२/२०२१.
६. आदेश क्रमांक वैदय/१७/कावि/२८८/२०२१ दिनांक २४/०२/२०२१,
७. आदेश क्रमांक वैदय/०३/कावि/१६७/२०२१ दिनांक ०१/०३/२०२१
८. आदेश क्रमांक वैदय/१७/कावि/४५९/२०२१ दिनांक १२/०३/२०२१
९. आदेश क्रमांक वैदय/१७/कावि/७०२/२०२१ दिनांक १९/०३/२०२१
१०.आदेश क्रमांक वैदय/१७/कावि/७२४/२०२१ दिनांक ३०/०३/२०२१
११.आदेश क्रमांक वैदय/१७/कावि/७२९/२०२१ दिनांक ३१/०३/२०२१
१२.मा.स्थायी समिती सभा यांनी ठराव क्रमांक ९०५४ दिनांक २४/०३/२०२१
१३.मान्य प्रस्ताव दिनांक - ०२/०४/२०२१

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी१८
वैद्यकिय विभाग मुख्य कार्यालय
क्र. वैद्य/०३/कावि/ २५२ /२०२१.
दि. ०२/०४/२०२१.

विषय – वैद्यकिय विभागासाठी दंतशल्य चिकित्सक संवर्गातील पदे दरमहा एकत्रित मानधनावर हंगामी स्वरुपात दोन महिन्याचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात भरणेबाबत.

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विविध दवाखाना / रुग्णालयात विविध अभिनामाची पदे एकत्रित मानधनावर ०६ महिने कालावधीसाठी भरणेकामी मा. स्थायी समिती सभेने उपरोक्त वाचले क्र. १ अन्वये मान्यता दिलेली आहे. उपरोक्त वाचले क्रमांक २ अन्वये दि. ०७/१२/२०२० रोजी विवीध वृत्तपत्रामध्ये व महापालिकेच्या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली होती. प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीची अनुषंगाने विविध तंत्रिक संवर्गातील उमेदवारांच्या लेखी परीक्षा घेण्यात आलेल्या होत्या . लेखी परिक्षा तसेच गुणानुक्रम मार्किंग पॅटर्ननुसार मा. स्थायी समिती सभा यांचेकडील मंजुर ठराव व निवड समितीने शिफारस केलेनुसार उपरोक्त वाचले क्रमांक १ ते ३ ला अनुसरुन वाचले क्रमांक ४ चे आदेशान्वये उमेदवारांची नियुक्ती करणेत आलेली आहे.

तदनंतर कोवीड १९ चे रुग्णांची पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात मोठ्या प्रमाणावर वाढ होत असलेने रुग्णालय / दवाखान्यातील कामकाजासाठी आवश्यक असणारी विविध अभिनामाची पदे एकत्रित मानधनावर पुर्णता तात्पुरत्या स्वरुपात भरणेकामी मा.स्थायी समिती सभा यांनी उपरोक्त वाचले क्रमांक ५ अन्वये मान्यता दिलेने उपरोक्त वाचले क्रमांक ६ ते ९ नुसार एकत्रित मानधनावर दोन महिने कालावधीकरीता विविध तांत्रीक संवर्गातील पदावरिल उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गत करणेत आलेले आहेत.

सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोवीड १९ विषाणुमुळे वाधीत रुग्णांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे कोवीड १९ चे लसीकरण , कॉन्ट्रक्ट ट्रेसिंग , स्वॅब टेस्टिंग , रॅपीड अँन्टीजेन / आरटी पीसीआर टेस्टिंग , नव्याने सुरु होणारे कोवीड केअर सेंटर मधील कामकाज , गृह विलगीकरण कक्षातील (Home Isolation) रुग्णांची माहीती घेणे तसेच वाँररुममधील कामकाज तसेच कोवीड १९ अनुषंगाने सर्व झोननिहाय कामकाज करणेकामी सोबतच्या प्रपत्र "अ" मध्ये नावासमोर नमुद केलेल्या एकत्रीत मानधनावर महानगरपालिकेच्या विविध रुग्णालय / दवाखान्यामध्ये आदेशाचे दिनांकापासुन खालील अटी व शर्तीचे अधीन राहून दिनांक - ०२-०६-२०२१ अखेर पुर्णत: तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक देणेत येत आहे.

अटी व शर्ती –

१) दंतशल्य चिकित्सक यांना दररोज सकाळी ९.०० ते २.०० या वेळेत ओ.पी.डी. व रुग्णालयाचे कामकाज करणे बंधनकारक राहील. तसेच दररोज इमर्जन्सी ऑन कॉल ड्युटी करावी लागेल.

२) जनरल ड्युटी दंतशल्य चिकित्सक पदावरील उमेदवारांना रोज किमान ८ तास ड्युटी करावी लागेल. तसेच आठवड्यातून दोन दिवस ऑन कॉल ड्युटी करावी लागेल.

३) दंतशल्य चिकित्सक यांना रात्रपाळीत कामकाज करावे लागेल. त्याची वेळ दिवसाआड संध्या. ५.०० ते दुस-या दिवशी सकाळी ९.०० पर्यंत अशी राहील. त्याचप्रमाणे कामकाजाचे दुस-या दिवशी सार्वजनिक सुट्टी रविवार आल्यास दुपारी १.०० वाजेपर्यत रुग्णालयामध्ये कामकाज करावे लागेल.

४) मानधनावरील सेवा कालावधीत उपस्थित दिवसांचे एकवट मानधन विहीत केलेनुसार देण्यात येईल. महापालिकेच्या नियमित वेतनश्रेणीतील कर्मचा-यांना लागु असणा-या सुविधा, हक्क, आर्थिक व तदनुषंगिक अन्य कोणतेही लाभ देय राहणार नाहीत.

५) आठवडयातुन फक्त एक दिवस दवाखाना / रुग्णालयाच्या सोयीनुसार साप्ताहीक सुटटी राहील. परंतु ऑन कॉल ड्युटी करावीच लागेल. मानधन कालावधीत दीड महिना काम केलेनंतर १ प्रमाणे किरकोळ रजा देय राहतील. सार्वजनिक अथवा साप्ताहिक सुटटीच्या दिवशी बाहयरुग्ण विभागाचे कामकाज बंद असते त्या दिवसाची सुटटी उपभोगता येईल (शिफ्ट ड्युटी व रात्रपाळीत कामकाज करणारे वैद्यकिय अधिकारी वगळून) तथापि सदर दिवशी ऑन कॉल ड्युटी करावीच लागेल. तसेच सार्वजनिक सुट्टीचे दिवशी केलेल्या कामकाजाबाबतचा कोणताही मोबदला / फायदे देय राहणार नाहीत.

६) कामकाजाची वेळ दवाखाना / रुग्णालयाच्या वेळापत्रकानुसार व रुग्णालयीन कामकाजाचे सोयीनुसार राहील. तसेच वरिल प्रमाणे नमूद प्रपत्रा मधील अधिकारी / कर्मचा-यांना नेमून दिलेल्या दवाखाना / रुग्णालयासह कामकाजाचे सोयीनुसार / आवश्यकतेनुसार अन्य दवाखाना / रुग्णालय / कोवीड केअर सेंटर / वॉररुम मध्ये देखील कामकाज करणे बंधनकारक राहील.

७) कोवीड १९ चे लसीकरण , कॉन्ट्रक्ट ट्रेसिंग , स्वॅब टेस्टिंग , रॅपीड अँन्टीजेन / आरटी पीसीआर टेस्टिंग , नव्याने सुरु होणारे कोवीड केअर सेंटर मधील कामकाज , गृह विलगीकरण कक्षातील (Home Isolation) रुग्णांची माहीती घेणे तसेच वॉररुममधील कामकाज तसेच कोवीड १९ अनुषंगाने सर्व झोननिहाय कामकाज करणे बंधनकारक राहिल,

८) आदेशातील अधिकारी / कर्मचारी यांना शिफ्ट नुसार तसेच नियंत्रीत अधिकारी यांचे सुचनेनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील.

९) मानधनावरील पदाचे कामकाज नेमणुक देणेत आलेल्या रुग्णालयात राहील व त्यावर संबधित जेष्ठ वैदयकिय अधिकारी व प्रभारी वैद्यकीय अधिकारी यांचे नियंत्रण राहील.

१०)मानधनाचे पदावर काम करताना आपणाकडुन सर्वांना नि:पक्षपातीने वागणुक मिळणे आवश्यक आहे. कामासाठी दिलेल्या साहित्याची जबाबदारी आपणावर राहील.

११)मानधनावरील नियुक्त केलेल्या पदाचे काम सोडताना किमान एक महिना अगोदर लेखी पुर्वसुचना कार्यालयास देणे आपणावर बंधनकारक राहील. अन्यथा आपणांस १ महिन्याचे मानधन मनपा कोषागरात भरावे लागेल.

१२) सदर आदेशान्वये नियुक्ती दिलेले उमेदवार यापुर्वी मागील आदेशानुसार सलग कालावधीत कार्यरत असल्याचे निदर्शनास आल्यास सदरची नियुक्ती तात्काळ रद्द करणेत येईल.

१३)आपले काम / वर्तणुक असमाधानकारक असल्याचे निदर्शनास आल्यास तसेच आपण विनापरवाना गैरहजर राहिल्यास अथवा आपली हजेरी असमाधानकारक असल्यास आपणास मनपा सेवेची आवश्यकता नसलेचे समजणेत येऊन, कोणतीही पुर्वसुचना न देता आपणास मानधनावरील नियुक्ती दिलेल्या पदाच्या जबाबदारीतुन कार्यमुक्त करणेत येईल.

१४)आपले सेवेची महापालिकेस आवश्यकता नसलेस कोणतीही पुर्वसुचना न देता आपणास मानधनावरील नियुक्तीच्या पदाच्या जबाबदारीतून कार्यमुक्त करणेत येईल.

१५)एकत्रित मानधनाव्यतिरीक्त अन्य कोणतेही फायदे मिळणार नाहीत व मासिक मानधन सबंधित दवाखाना / रुग्णालयामार्फत ई.सी.एस. द्वारे अथवा बँक खात्यामध्ये जमा केले जाईल.

१६)नियंत्रित प्रमुखांचे सुचनेनुसार आवश्यकतेप्रमाणे कामकाज करणे बंधनकारक राहील.

१७)मानधनावरील नियुक्ती म्हणजे नोकरी नाही. त्यामुळे मनपा आस्थापनेवर वेतनश्रेणीत नियुक्ती मिळावी म्हणुन निवेदन सादर करणार नाही किंवा तसा बाहय दबाव आणणार नाही. कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करणार नाही याबाबत सोबत सादर केलेल्या विहित नमुन्यात (दोन साक्षीदारासह संपूर्ण नाव व पत्ता नमुद करणे आवश्यक आहे.) हमीपत्र लिहुन द्यावे लागेल.

१८) सदर आदेशातील उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलली व्यक्तीगत माहीती व मुळकागदपत्राच्या प्रती खोट्या / बनावट असलेचे आढळुन आल्यास भारतीय दंडसंहिता कलम १९९ व २०० मधील तरतुदीनुसार उमेदवार कारवाईस पात्र राहील.

१९) सदर आदेशातील अटि व शर्तीचा भंग केल्यास इंडीयन कॉन्ट्रॅक्ट अॅक्ट मधील कलम ७३ चे तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करणेत येईल.

२०)मानधनावरील नेमणूक पूर्णपणे तात्पुरत्या स्वरुपाची आहे. त्यामुळे कोणत्याही कायमपदी नेमणूकीचा हक्क राहणार नाही.

२१)आयकर नियमाप्रमाणे मानधन रक्कमेतून TDS वजा करून अंतिम देय रक्कम अदा करणेत येईल.

२२)मनपाचे अन्य कर्मचा-यांप्रमाणे बायोमेट्रीक रजिस्ट्रेशन करणे बंधनकारक असून बायोमेट्रीक हजेरी विचारात घेऊन त्याप्रमाणे मानधन अदा केले जाईल.

२३)प्रस्तुत नियुक्त्यांकरीता ग्राह्य धरलेल्या अर्हतांचा महापालिकेच्या नियमित वेतनश्रेणीमधील होणा-या नियुक्त्यांचे अर्हतेशी कोणताही संबंध राहणार नाही.

२४)प्रस्तुतचे आदेशानुसार मानधनावरील नियुक्तीचा कालावधी संपुष्ठात आलेनंतर सदरचे आदेश आपोआप रद्द होतील.

२५)सोबत जोडलेल्या प्रपत्र "अ" मध्ये नमुद उमेदवांरानी विहीत दिनांकापासून ०३ दिवसाचे आत वैद्यकिय मुख्य कार्यालयात रुजू होणे आवश्यक आहे. रुजू होते वेळी कागदपत्रांच्या मुळ प्रती व अद्यावत नोंदणी प्रमाणपत्र तपासणीसाठी आणणे बंधनकारक राहील. विहित मुदतीत रूजू न झालेस आपली नियुक्ती आपोआप संपुष्ठात येईल. व त्यामुळे रिक्त पदांवर अन्य उमेदवारांची नियुक्ती करणेत येईल. तदनंतर याबाबत आपले म्हणणे विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी

सही/-
( राजेश पाटील )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८.

प्रति, – <u>सर्व संबंधित उमेदवार</u>.

प्रत –

१) लेखा विभाग २) प्रशासन विभाग

३) संबंधित दवाखाना / रुग्णालय -------------

( डॉ लक्ष्मण गोफणे)
सहा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८

वैदयकिय मुख्य कार्यालय

आदेश क्रमांक वैदय/३/कावि/२५२/२०२१ दिनांक -०२/०४/२०२१ चे लगत प्रपत्र "अ"

| अ.क्र | उमेदवारांचे नाव | पदनाम | मानधन र.रु. |
|---|---|---|---|
| १ | डॉ.जायभाये सुहास | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| २ | डॉ. ऐश्वर्या विजय गायधनी | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| ३ | डॉ.स्नेहल चंद्रशेखर तारू | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| ४ | डॉ.वेदंगी कोलते | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| ५ | डॉ.मनिष नागेश डोईफोडे | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| ६ | डॉ.पोळ राजगौरी | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| ७ | डॉ.बावीस्कर पुष्पराज | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| ८ | डॉ.गौरी श्रीकांत | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| ९ | डॉ.अनुराधा राऊत | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| १० | डॉ.आर.प्रदीप | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| ११ | डॉ.आसिया आत्तार | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| १२ | डॉ.अविनाश येळे | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| १३ | डॉ. श्रुती अशोक मोरे | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| १४ | डॉं.सायली दादाजी पाटील | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| १५ | डॉ.कर्णे वैभव मारुती | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| १६ | डॉ. श्रेयस शशिकांत माळी | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| १७ | डॉ.दिपिका नंदलाल येळे | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| १८ | डॉ.सायली पाटील | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| १९ | डॉ.कदम प्रिया गोपाळराव | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| २० | डॉ.वाहूरवाघ अमोल विलास | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| २१ | डॉ.गायकवाड शंकर लक्ष्मण | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| २२ | डॉ.समृध्दी नाईकरे | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| २३ | डॉ.अतुल नानासाहेब केंजळे | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| २४ | डॉ.विरेंद्र धनंजय सिंहासने | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| २५ | डॉ.नमिता राय | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |

| अ.क्र | उमेदवारांचे नाव | पदनाम | मानधन र.रु. |
|---|---|---|---|
| २६ | डॉ.दिव्या परदेशी | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| २७ | डॉ.आशिष केंद्रे | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| २८ | डॉ.पूजा खानापूरे | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| २९ | डॉ.नेहा भास्करराव भोले | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| ३० | डॉ.शलाका नेत्रगावकर | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| ३१ | डॉ.रोहित जितेंद्र जतकर | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| ३२ | डॉ.हिना सलिम नायकोडे | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| ३३ | डॉं.अविरत सुभाष नवले | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| ३४ | श्रीम अश्विनी नामदेव देवकर | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| ३५ | डॉं. प्रविण उत्तम गायकवाड | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| ३६ | डॉं. राहुल हिरालाल फापाळे | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| ३७ | डॉ.गुजराथी ध्रुव राजेश | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| ३८ | डॉ.पटनी मानसी | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| ३९ | डॉ.श्वेता जगताप | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |

सही/-
राजेश पाटील
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

(डॉं. लक्ष्मण गोफणे )
सहा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८